महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दुरध्वनीक्रमांक :- ०२२-२६५२ ९९२६
ई-मेल :-dcpcybercrime.mum@mahapolice.gov.in Bank

पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे), मुंबई यांचेकार्यालय,
पहिलामजला, बी.के.सी. पोलीसठाणे,
बी.के.सी., बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१


**!! प्रेसनोट !!** दि.२८/११/२०२४

# १९३० सायबर हेल्पलाईन, मुंबई पथकास २४ तासात नागरीकांचे सायबर गुन्हयात फसवणूक झालेले रुपये १.३१ करोड वाचविण्यात यश.

मुंबई शहरातील नागरीकांची सायबर गुन्हयामध्ये फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅक खात्यामध्ये गोठविण्याकरीता मुंबई पोलीस गुन्हे शाखे अंतर्गत १९३० हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे. याद्वारे सायबर गुन्हयात आर्थिक फसवणुक झालेले तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक झालेनंतर १९३० हेल्पलाईनवर तात्काळ संपर्क केला असता, त्यांची फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅक खात्यांवर गोठविण्यात येते.

दिनांक २६/११/२०२४ रोजी १९३० सायबर हेल्पलाईनवर प्राप्त विविध तक्रारीमध्ये **WhatsApp वर बनावट प्रोफाईल तयार करुन पैशांची मागणी किंवा ट्रान्झेक्शंन करण्यास भाग पाडणे (WhatsApp Impersonation Scam) व इतर सायबर गुन्हयांमध्ये** नागरिकांची फसवणूक झालेल्या रकमेंपैकी रूपये **१,३१,३३,१२८/- (अक्षरी रु. एक कोटी एकतीस लाख तेहतीस हजार एकशे अठ्ठावीस)** विविध बॅक खात्यांवर २४ तासात होल्ड करुन यांना वाचवण्यात १९३० सायबर हेल्पलाईन पथक यांना यश आले आहे.

मरीन लाईन्स, मुंबई येथे खाजगी कंपनीमध्ये आर्थिक व्यवहार पाहणारे तक्रारदार यांना त्यांचे कंपनीचे मालक यांचे नावे बनावट **WhatsApp** प्रोफाईल तयार करुन कंपनीचे कामकाजकरीता **८५,००,०००/-** रूपये चे ट्रान्झेक्शंन करण्यास भाग पाडले. सदर प्रकरणी फसवणूक झाल्याबाबत मालकाचे लक्षात आल्यावर त्यांनी तात्काळ १९३० सायबर हेल्पलाईनवर संपर्क करुन माहीती दिली.

त्यावरुन पोउनि मंगेश भोर, पोउनि बावस्कर, मपोशिक्र.०९२३१५/माने, पोहवा. ०१०६४४/राउळ, मपोहवा.०५०१६४/वालवलकर, पोशिक्र.०८०५९१/पाटील यांनी तात्काळ NCRP PORTAL वर तक्रार दाखल करुन संबधित बॅकेच्या नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून केलेल्या कार्यवाहीमुळे तक्रारदार यांची सायबर गुन्हयात फसवणूक झालेली रुपये **८५,००,०००/- (१०० % रक्कम )** व इतर सायबर फसवणूकीच्या तक्रारी मधील रूपये **४६,३३,१२८/-** अशी एकुण रूपये **१,३१,३३,१२८ /-** संबधित बॅक खातेवर होल्ड करण्यात १९३० हेल्पलाईन पथक, गुन्हे शाखा, मुंबई यांना यश आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शशीकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्ताराम चव्हाण, व.पो.नि. पश्चिम प्रा. सायबर पो. ठाणे पोउनि मंगेश भोर, पोउनि बावस्कर यांच्या १९३० हेल्पलाईन पथक, यांनी पार पाडली आहे.

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी सायबर गुन्हयामध्ये आर्थिक फसवणुक झाल्यास तात्काळ १९३० हेल्पलाईनवर संपर्क करावा जेणेकरुन आपली फसवणूक झालेली संपुर्ण किंवा जास्तीत जास्त रक्कम वाचली जाईल.

## नागरीकांना आवाहन/प्रतिबंधात्मक उपाय :-

- **पेमेंट विनंत्यांची शहानिशा करा:** पैसे, पेमेंट किंवा संवेदनशील माहितीसाठी विनंत्या नेहमी पुन्हा - पुन्हा तपासा (उदा. त्यांना ज्ञात नंबरवर कॉल करणे किंवा ईमेलद्वारे पडताळणी करणे).
- **अनपेक्षित संदेशांवर विश्वास ठेवू नका:** पैसे मागणारे कोणतेही अनपेक्षित संदेश सावध रहा, जरी ते एखाद्या विश्वासू संपर्काकडून आलेले दिसत असले तरीही योग्यती शहानीशा केल्याशिवाय पुढील कार्यवाही करू नका.
- **टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA) सक्षम करा:** **WhatsApp settings** मध्ये जाऊन **2FA** करा. हे आपल्या **WhatsApp** मध्ये अनधिकृत प्रवेश रोखण्यास मदत करू शकते.
- **कर्मचाऱ्यांना आणि सहकाऱ्यांना शिक्षित करा:** व्यापार किंवा व्यवसाय मध्ये अशा प्रकारची फसवणूक होण्यापासून रोखण्यासाठी या प्रकारच्या **Fraud** बाबत कर्मचा-यामध्ये जागरुकता वाढवणे आवश्यक आहे.

**तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक फसवणूक झाल्यास तात्काळ सायबर क्राईम हेल्पलाईन १९३० वर किंवा https://cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा.**

**# cybersafemumbai**

**Report Cyber Crime On Helpline 1930**

**https://cybercrime.gov.in**